**नियमित दिवाणी दावा क्र.१२६/२०२०**

(अशोक माने वि. अभिजित माने व इतर)

**CNR No. MHSO07-000155-2020**

## निशाणी क्र.४५ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.३ यांनी त्यांच्याविरुध्द झालेला 'विना म्हणणे व कैफियत' आदेश रद्द होऊन तसेच त्यांना म्हणणे व कैफियत दाखल करणेस झालेला विलंब माफ होऊन म्हणणे व कैफियत दाखल करणेस परवानगी मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादीच्या कथनानुसार, त्यांना याकामी जुनी माहिती व कागदपत्रे मुदतीत न मिळाल्यामुळे त्यांना वेळेस म्हणणे व कैफियत दाखल करता आले नाही. त्यांना म्हणणे व कैफियत दाखल करण्यास उशीर झाला आहे. त्यांनी जाणीवपूर्वक विलंब केलेला नाही. सबब, त्यांच्या विरुध्द झालेला 'विना म्हणणे व कैफियत' आदेश रद्द होऊन तसेच त्यांना म्हणणे व कैफियत दाखल करणेस झालेला विलंब माफ होऊन त्यांनी अर्जासोबत दाखल केलेले म्हणणे व कैफियत स्वीकारण्यात यावे अशी त्यांनी विनंती केली आहे.

३. वादीने प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे. विकल्पेकरुन अर्ज मंजूर करावयाचा झाल्यास जास्तीत जास्त रकमेची आकारणी करण्याची विनंती केली आहे.

४. प्रकरणाचे अवलोकन केले असता हे स्पष्ट आहे की, वादी व प्रतिवादी या दोघांचे देखील हक्क हितसंबंध दाव्यात गुंतलेले आहेत. त्यामुळे त्यांना त्यांच्या बचावाची संधी देखील मिळणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादीच्या विनंतीनुसार त्यांच्याविरुध्द झालेला 'विना म्हणणे व कैफियत' आदेश रद्द न केल्यास तसेच त्यांना म्हणणे व कैफियत दाखल करणेस झालेला विलंब माफ न केल्यास आणि त्यांना त्यांचे म्हणणे व कैफियत दाखल करण्याची परवानगी न दिल्यास त्यांचे अपरिमित असे नुकसान होईल. परंतू तशाप्रकारे परवानगी दिली गेल्यास वादीवर कुठलाही अन्याय होत नाही. उलटपक्षी दावा गुणदोषावर निकाली करण्यास त्याची मदतच होते. त्यामुळे

खालील आदेशाद्वारे प्रस्तुतचा अर्ज निकाली करण्यात येत आहे.

<u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १. | अर्ज रक्कम रुपये २००/– खर्चासह मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | प्रतिवादी क्र.३ यांनी खर्चाची रक्कम वादीस पुढील तारखेपर्यंत दयावी. |
| ३. | प्रतिवादी क्र.३ यांनी वरीलप्रमाणे खर्चाची पूर्तता केल्यानंतर त्यांच्याविरुध्द झालेला 'विना म्हणणे व कैफियत' आदेश रद्द करण्यात येत आहे. तसेच त्यांना म्हणणे व कैफियत दाखल करणेस झालेला विलंब माफ करण्यात येत आहे आणि अर्जासोबत दाखल केलेले म्हणणे व कैफियत अभिलेखावर घेण्यात येत आहे. |

PRIYANKA RAMESH PATIL

Digitally signed by PRIYANKA RAMESH PATIL
Date: 2025.12.12 15:22:52 +0530

(पी. आर. पाटील)

दिनांकः– १२.१२.२०२५ ५वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पंढरपूर

<u>Certificate</u>

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | - | S. S. Tupdauru |
| Court | - | $5^{th}$ Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Pandharpur |
| Date of Judgment/Order | - | 12.12.2025 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | - | 12.12.2025 |
| Judgment/Order uploaded on | - | 12.12.2025 |